# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली

## जनसंपर्क शाखा

P.R.O Office, Gadchiroli
**Phone No. 07132223142 Address: SP Office,Gadchiroli**
**E-mail : Prospoffice.gadchiroli@gmail.com**

---

# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक २६/०८/२०१९

| **पो.स्टेशन/अप.क्र./कलम** | **घटनास्थळ/घटना ता.वेळ** | **फिर्यादी व आरोपीतांचे नाव** |
|---|---|---|
| अहेरी अप. क्र.१८२/२०१९ कलम ६५(ई),महा. दारुबंदि अधि. | मौजा देवलमरी २२ किमी दक्षिण **घटना ता. वेळ :-** दिनांक २५.०८.२०१९ चे २१.३० ते २२.१५ वा.पर्यत | सरकार तर्फे :- पोहवा/१४९२ भाऊराव महादेव बोरकर नेम. स्थानिक गुन्हे शाखा पोलीस अधिक्षक कार्या. गडचिरोली पाहिजे आरोपीतांचे नाव :- चंदु लसमय्या उटनुर वय २४ वर्षे, रा. देवलमरी, ता. अहेरी जिल्हा गडचिरोली |

| **माहिती कशी प्राप्त झाली** | **अवैध दारु रेड मधील सक्रिय अधिकारी/कर्मचारी** |
|---|---|
| गोपनिय बातमीदारा कडुन मिळालेल्या माहिती वरुन | सफौ/ दादाजी करकाडे, सफौ/गंगाधर भोयर, पोहवा/भाऊराव बोरकर, पोशि/नुतेश धुर्वे, चापोहवा/रमेश मेश्राम स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक, कार्या. गडचिरोली |

महाराष्ट्र शासनाने सन १९९२ पासुन गडचिरोली जिल्हा हा दारुबंदि जिल्हा म्हणुन घोषीत केला असतांना सुध्दा गडचिरोली जिल्हायातील काहि अवैध दारु विक्रेते हे शेजारील आध्रप्रदेश,छत्तीसगड, मध्यप्रदेश तसेच सिमावर्ती गोंदिया, भंडारा, तसेच नागपुर जिल्हयातील अनुज्ञाप्तीधारक दारु विक्री दुकाणातुन दारुची खरेदी करुन चारचाकी तसेच दुचाकी वाहनाने आडमार्गाने बेकादेशिर वाहतुक करुन स्थानिक चिल्लर दारु विक्रेत्यांना घरपोच दारुचा पुरवठा करीत असतात, अशा अवैध दारु विक्रेत्यांवर अंकुश बसावा याकरीता मा. श्री. शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक अधिक्षक गडचिरोली यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु, जुगार व इतर अवैध व्यवयांवर रेड करुन प्रभावीपणे कायदेशिर कारवाई करण्याची जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडत असतांना दिनांक २५.०८.२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथकास गोपनिय सुत्रांकडुन माहिती मिळाली की, मौजा देवलमरी येथील ठोक दारु विक्रेता चंदु लसमय्या उटनुर हा शेजारील आंध्रप्रदेश राज्यातुन देशी दारु खरेदी करुन अहेरी, आलापल्ली येथील स्थानिक चिल्लर दारु विक्रेत्यांना घरपोच पुरवठा करण्याकरीता स्वत:चे राहाते घरी दारु साठवणुक करुन ठेवली असल्याबाबत मिळालेल्या माहितीचे आधारे मा. श्री. डॉ. मोहित कुमार गर्ग, अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) तसेच पोलीस निरीक्षक उल्हास भुसारी यांना माहिती सांगुन त्यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेकडील वर नमुद पोलीस पथक हे मौजा देवलमरी येथील अवैध ठोक दारु विक्रेता चंदु लसमय्या उटनुर यांचे घरी पोहचुन अवैध दारु संबधात त्याचे राहाते घरी झडती घेतली असता, त्याचे राहाते घरी त्याचे ताब्यात एकुन २,४४,८००/- **रुपये किमंतीच्या इंपेरियल ब्ल्यु व्हिस्की कंपनीच्या प्रत्येकी ३७५ मिली**

**क्षमतेच्या एकुन ४०८ सिलबंद बॉटल मिळुन आल्यात.** घटनास्थळावरुन जप्ती केलेला मुद्देमाल ताब्यात घेवुन गुन्हयातील आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन अहेरी येथे तक्रार दिल्याने आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन अहेरी येथे दिनांक २६.०८.२०१९ रोजी अपराध क्रमांक १८२/२०१९ कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदि अधिनियमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेकडील पथका कडुन गडचिरोली जिल्हयात अहोरात्र अवैध दारु रेड संबधात मोहिम राबवुन करीत असलेल्या प्रभावी कारवाई मुळे आगामी पोळा सनाचे निमीत्ताने अवैध दारु विक्रि करणारे तसेच बेकायेशिर रित्या दारुची वाहतुक करणा-या लोकांचे धाबे दणानले आहेत.

